| | | |
|---|---|---|
| MHGO040018502025 | DISTRICT COURTS MAHARASHTRA<br>सत्यमेव जयते | दाखल दिनांक ०४.१०.२०२५.<br>नोंदणी दिनांक ०४.१०.२०२५.<br>निकाल दिनांक**२०.०३.२०२६**<br>कालावधीः वर्ष महिने दिवस<br>०० ०५ १६ |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आमगांव यांचे न्यायालयात, आमगांव.**

**(पिठासीन अधिकारी ए. आर. जोशी)**

---------------------------------------------

**<u>म.सं.कौ.हि.का. अर्ज क्र. १९४/२०२५.</u>** **<u>नि. क्र. ०८.</u>**

[१] **किरण अमोल मेश्राम,**
वयः– २५ वर्षे, धंदा– निरंक,

[२] **प्रतीक अमोल मेश्राम,**
वयः– ०३ वर्षे,
सध्या रा. भजेपार, ता. पो. अंजोरा
ता. सालेकसा, जि. गोंदिया. ..... अर्जदार.

**विरुध्द**

**अमोल शिवचरण मेश्राम,**
वयः– ३५ वर्षे, धंदा– दुकानदार,
रा. रिशामा, बिरसी रोड,
ता. आमगांव जि. गोंदिया ..... गैरअर्जदार.

---------------------------------------------

अर्जदारातर्फे श्री ए. पी. बोरकर विधिज्ञ.
गैरअर्जदारातर्फे – एकतर्फा.

---------------------------------------------

**<u>न्या य नि र्ण य</u>**

(दिनांक २०.०३.२०२६ रोजी घोषित)

अर्जदारांनी भारतीय नागरीक सुरक्षा सहिंता, २०२३ चे कलम १४४

अन्वये पोटगी मिळणेकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**<u>अर्जदाराचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे;</u>**

२. अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार यांचे लग्न जातीरिवाजाप्रमाणे दिनांक २४.०१.२०२१ रोजी सुर्यदिव मांडोदेवी देवस्थान समिती, बघेडा, ता. आमगांव जि. गोंदिया येथे संपन्न झाले. अर्जदार क्र. १ लग्नानंतर गैरअर्जदारांच्या घरी नांदायला गेली व आपल्या वैवाहिक जिवनाची सुरुवात केली.

३. अर्जदाराचे पुढे कथन असे की, लग्नानंतर गैरअर्जदार व त्याचे कुटुंबातील सदस्य मात्र १५ दिवस तिच्याशी चांगले वर्तणुक केले. त्यानंतर गैरअर्जदार व त्यांचे आई–वडील हे हुंड्याचे लोभी असून ते तिला नेहमी हुंडयाची मागणी करत होते व हुडयासाठी तिचा शारिरीक व मानसिक छळ करत होते. गैरअर्जदार नेहमी तिला तिच्या माहेरुन रु. ५,००,०००/– आणण्याकरिता दबाव टाकत होते. तिचे आई–वडील अत्यंत गरीब असून, त्यांच्या ऐपतीनुसार लग्नात अनेक भेट वस्तू दिले आणि आता ते गैरअर्जदाराच्या सदर गैरकायदेशीर मागणी पूर्ण करण्यास असमर्थ होते, म्हणून तिने सदर मागणीस नकार दिला. त्यामुळे गैरअर्जदाराने तिला अश्लील शब्दाने शिवीगाळ केले आणि त्यांना मानसिक व शारीरीक त्रास दिले.

४. अर्जदाराचे पुढे कथन असे की, गैरअर्जदार नेहमी तिच्याशी हुंड्याची मागणी करत होता व त्याकरिता तिच्यावर घरेलु हिंसाचार करत होता. गैरअर्जदार तिला बरोबर जेवण देत नव्हते. जेंव्हा अर्जदार क्र. १ आजार पडत होती तेंव्हा गैरअर्जदार तिचे औषधी उपचार करीत नव्हता. गैरअर्जदाराचे क्रुर व्यवहार आणि घरघुती हिंसाचार अर्जदार क्र. १ ने तिचे पालकांना सांगितले. त्यावर तिचे पालकांनी गैरअर्जदार व त्याचे आई–वडीलांना योग्य ती समज दिली. परंतु, गैरअर्जदारांनी त्यांच्या व्यवहारात काहीच बदल केले नाही आणि अर्जदारावर त्यांचे क्रुर व्यवहार आणि घरघुती हिंसाचा सुरु ठेवले.

५. अर्जदाराचे पुढे कथन असे की, गैरअर्जदार हा दारुच्या व्यसनी असून नेहमी दारु पिवून तिच्यासोबत मारहाण करत होता. गैरअर्जदार व त्याचे आई–वडील

नेहमी तिला हुंड्यासाठी मानसीक व शारिरीक त्रास देत होते. दिनांक २२.०९.२०२५ रोजी गैरअर्जदार दारु पिवून तिच्याशी भांडण करु लागला व हुंडयाची मागणी करुन तिच्यासोबत शिवीगाळ करुन मारहाण केली. जेव्हा अर्जदार क्र. १ ने त्याची मागणी पूर्ण करण्यास नकार दिली तर त्याने तिला घरातून बाहेर काढून दिला. अर्जदार क्र. १ हिने गैरअर्जदार व त्याच्या आई–वडीलाविरुद्ध पोलीस स्टेशन, आमगांव येथे तोंडी रिपोर्ट दिली होती. परंतु, पोलिसांनी त्यांच्या विरोधात कोणतीही कार्यवाही केली नाही.

६. अर्जदाराचे पुढे कथन असे की, दिनांक २२.०९.२०२५ रोजी ती, तिच्या पालकांच्या घरी परत आली. त्यानंतर गैरअर्जदार तिला न्यायला कधीच आला नाही व तिच्या उदरनिर्वाहकरीता कोणतेच सोयी केली नाही. तसेच अर्जदार क्र. १ जवळ काही उत्पन्नाचे स्त्रोत नसून गैरअर्जदाराकडे ५ एकर शेती आहे. त्यामधून तो दरवर्षी २ पिके घेतात आणि त्यातून २,००,०००/–वार्षिक उत्पन्न घेतात. याशिवाय गैरअर्जदार हा किराना दुकान चालवितो व त्यापासून दरमाह २,००,०००/– रुपये कमवितो. त्यामुळे गैरअर्जदार हा सहजतेने अर्जदारांना पोटगी देऊ शकतो. म्हणुन अर्जदारांनी पोटगी म्हणून दरमहा २०,०००/– रुपये पोटगी मिळण्याची अर्ज दाखल तारखेपासून आदेश करण्याची विनंती अर्जदारानी केली आहे.

७. गैरअर्जदार यांना समन्स बजावणी झाली, तरी ते प्रस्तुत प्रकरणात हजर न झाल्याने नि. क्र. १ वरील आदेशान्वये त्याच्याविरुद्ध प्रकरण एकतर्फा चालविण्यात आला.

८. संपरिक्षेदरम्यान अर्जदाराने अर्जातील कथनांच्या पृष्ठ्यर्थ साक्षीदार क्र.१ म्हणुन अर्जदाराचे (नि. क्र.०६) खाली पुरावा नोंदविला. अर्जदाराच्या वतीने नि. क्र. ०७ वरील पुरसिस सादर करुन अर्जदाराने तिचा पुरावा संपल्याचे न्यायालयाला कळविले.

९. गैरअर्जदार हे प्रकरणात हजर झाले नाही व त्यांनी त्यांचे लेखी म्हणणे दिले नाही किंवा त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी वेळेची मागणी सुद्धा केली नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात त्यांच्याविरुद्ध एकतर्फा चालविण्यात आला. त्यामुळे अर्जदाराचे पुराव्याचे खंडणार्थ कोणताही विरोधी पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

१०. अर्जदाराचा पुरावा, युक्तीवाद व कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील मुद्दे निष्कर्षासाठी निर्माण झाले. त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसासहित खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ. क्र. | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार असे सिध्द करतात काय की, गैरअर्जदारांनी कौटुंबिक हिंसाचार केला ? | होकारार्थी |
| २. | अर्जदार मागणी केल्याप्रमाणे पोटगी मिळण्यास पात्र आहेत काय ? असल्यास किती ? | अंशतः होकारार्थी |
| ३. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**अर्जदाराचा पुरावा –**

११. अर्जदार क्र. १ हिने तिच्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि. क्र. ०६ वर दाखल केले. अर्जदार क्र. १ हिचा सरतपास नि. क्र. ०६ च्या खाली घेण्यात आला. तिने तिच्या पुराव्यात, अर्जात कथन केल्याप्रमाणे सर्व बाबींची पुर्नरावृत्ती केली. तसेच तिने कथन केले की, तिच्या सरतपासातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर तिची सही आहे.

१२. गैरअर्जदाराविरुद्ध प्रकरण एकतर्फा चालविण्यात आल्याने अर्जदाराचा उलटतपास घेण्यात आलेला नाही, त्यामुळे अर्जदारातर्फे करण्यात आलेली कथने हे विनाआव्हानीत आहेत. सदर कथनांचे कोणत्याही प्रकारे खंडण करण्यात आले नाही. त्यामुळे त्यावर विश्वास ठेवणे गरजेचे आहे. अर्जदार क्र. १ ही स्त्री असून, कोणतीही स्त्री तिला त्रास झाल्याशिवाय आपले पतीविरुद्ध व आपले सासरच्या मंडळीविरुद्ध आरोप करुन तिचा संसार उध्वस्त करणार नाही. त्यामुळे तिने केलेले कथने विश्वासार्ह आहेत, यावरुन तिचा गैरअर्जदारांनी कौटूंबिक हिंसाचार केल्याचे दिसून येते. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकार्थी नोंदवत आहे.

१३. एकंदरीत पुराव्याचा अवलोकन केले असता गैरअर्जदाराकडे ५ एकर शेती आहे व वर्षातून २ पीक घेतात आणि त्यातून २,००,०००/–रुपये दरवर्षी कमवितो. याशिवाय गैरअर्जदार हा किराना दुकान चालवितो व त्यापासून दरमाह २,००,०००/– रुपये कमवितो. असे अर्जदाराने तिच्या सरतपासात कथन केले आहे. मात्र त्याबाबत अर्जदाराचे तोंडी शब्दाशिवाय कोणताही ठोस पुरावा अभिलेखावर दाखल केलेले नाही. तसेच अर्जदार क्र. १ हिने तिला कोणतेही उत्पन्नाचे साधन नसल्याचे कथन केले आहे. मा. सर्वोच्च न्यायालय, यांचे न्यायनिर्णय ''**(*Rajnesh v. Neha and Ors, Criminal Appeal No. 730 of 2020 (Arising out of SLP (Crl.) No. 9503 of 2018)''*,** नुसार अर्जदार व गैरअर्जदार यांना त्यांचे मालमत्तेबाबतचे शपथपत्र अभिलेखावर दाखल करणे आवश्यक आहे. परंतु, अर्जदाराने तिचे मालमत्तेबाबतचे शपथपत्र अभिलेखावर दाखल केलेले नाही. अर्जदाराच्या कथनांवर विश्वास ठेवून व तिच्या दैंनदीन गरजा, उदरनिर्वाहासाठी खर्च, औषधोउपचाराकरिता खर्च व महागाईचा दर हा सर्व गोष्टी विचारात घेता गैरअर्जदार याने अर्जदार क्र. १ यांना दरमहा ५००/– रुपये व अर्जदार क्र. २ यांना दरमहा १,०००/– रुपये देणे योग्य व न्यायोचित होईल, असे माझे स्पष्ट मत आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. २ चे निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवत आहे.

**मुद्दा क्र. ३ करिताः**–

१४. मुद्दे क्र. १ व २ चे निष्कर्ष व एकुणच वर नमुद विश्लेषणाच्या प्रकाशात विचारार्थ असलेल्या मुद्दा क्र. ३ च्या निष्कर्षात खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार याने अर्जदार क्र. १ यांना दरमहा रक्कम रुपये ५००/– (अक्षरी रुपये पाच शे फक्त) पोटगी म्हणून हा अर्ज दाखल केलेल्या तारखेपासून द्यावेत.

३. गैरअर्जदार याने अर्जदार क्र. २ यांना दरमहा रक्कम रुपये १०००/–

(अक्षरी रुपये एक हजार फक्त ) पोटगी म्हणुन हा अर्ज दाखल केलेल्या तारखे पासून तो सज्ञान होईपर्यंत द्यावेत.

४. गैरअर्जदार याने अर्जदारास या अर्जाच्या खर्चापोटी रक्कम रुपये १,०००/- (अक्षरी रुपये एक हजार फक्त) द्यावेत.

५. सदर निर्वाह भत्ता प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेच्या आत द्यावे.

JOSHI ATUL RATNAKAR

Digitally signed by JOSHI ATUL RATNAKAR
Date: 2026.03.23 11:03:29 +0530

(ए. आर. जोशी)

दिनांकः- २०.०३.२०२५. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आमगांव.